| | |
|---|---|
| | **पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण यांचे कार्यालय**<br>**दुरध्वनी क्रंमाक :- ०२१७-२७३२००९**<br>**ई मेल आय.डी :– sp.solapur.r@mahapolice.gov.in** |
| **प्रेसनोट दि ०२.१०.२०२१** | |

# * सोलापुर ग्रामीण जिल्हा पोलीस भरती २०१९ मधील लेखी परीक्षेतील आक्षेपांबाबत *

सोलापुर ग्रामीण जिल्हा पोलीस भरती २०१९ मोटार वाहन चालक पदाकरीता दि. ०१/१०/२०२१ रोजी लेखी परीक्षा घेणेत आलेली होती. सदर परीक्षेची उत्तरतालिका दि. ०१/१०/२०२१ रोजी सोलापुर ग्रामीण च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली होती. त्यामध्ये दिनांक ०२/१०/२०२१ रोजी सकाळी १०: ०० वा पर्यंत आक्षेप ई-मेल आय डी वर पाठविण्याबाबत प्रसिद्धीपत्रकाद्वारे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले होते. त्याप्रमाणे एकुण ११ प्रश्नांकरीता आक्षेप नोंदविण्यात आलेला होता. त्यापैकी खालील ७ प्रश्नांची उत्तरे स्पष्टीकरणासह देण्यात आलेली आहेत.

---------------------------------------------------------------------------

**१) प्रश्न:-** एक गोगलगाय २१ मीटर खोल असलेल्या विहीरीच्या तळापासुन विहीरीची भिंत चढायला सुरुवात करते. एका दिवसात ती ६ मी वर चढते व ३ मी खाली घसरते. तर विहीरी च्या बाहेर येण्यास तीला किती दिवस लागतील.?

१) ७ २ ) ६ ३) ५ ४) ४

**आक्षेप:-** पर्याय क्रमांक १ याचे उत्तर आहे.

**स्पष्टीकरण:-** गोगलगाय एक दिवसात ६ मी वर चढते व ३ मी खाली घसरते, म्हणजे एका दिवसात ती ३ मी वर चढते. ५ दिवसात ती १५ मी वर चढेल व सहाव्या दिवशी ६ मी वर चढुन ती विहीरीतुन बाहेर येईल. १५+६ बरोबर २१ मीटर होत. **पर्याय क्र. २ हे बरोबर उत्तर आहे**.

---------------------------------------------------------------------------

**२) प्रश्न :-** गटात न बसणारे पद ओळखा.

८, २७, ६४, १२५

१) ८ २) २७ ३) ६४ ४) १२५

**आक्षेप:-** पर्याय क्र २ सुध्दा याचे उत्तर येवु शकते.

**स्पष्टीकरण:-** वरील प्रश्नामध्ये सर्व संख्या हया फक्त कोणत्यातरी संख्येचे घन आहेत. पर्याय क्र. ३) ६४ हा वर्ग व घन असल्याने वेगळा पर्याय आहे . **पर्याय क्र. ३ हे उत्तर बरोबर आहे.**

**३) प्रश्न:-** खालील मालिकेत प्रश्न चिन्हाच्या जागी येणारी संख्या ओळखा.

१, ३, ७, १५, ३१, ....?...

१) ३३ २) ५२ ३) ६३ ४) ७१

**आक्षेप:-** या प्रश्ना चे उत्तर २७ पण येत आहे.

**स्पष्टीकरण:-** यातील प्रत्येक संख्येमध्ये २, ४, ८, १६ असा फरक आहे. पुढील संख्येमध्ये ३२ चा फरक येतो. ३१ या संख्येमध्ये ३२ मिळवले असता **पर्याय क्रमांक ३) हे उत्तर बरोबर आहे.**

---

**४) प्रश्न:-** जर 23*3=७०; २७*४=१०९; तर ३१*५=---?---

१) ३१५ २) १५६ ३) १६५ ४) ३५४

**आक्षेप:-** गणीत चुकीचे आहे.

**स्पष्टीकरण:-**२३*३=६९+१; २७*४=१०८+१; ३१*५=१५५+१=१५६ **पर्याय क्र. २ हे उत्तर बरोबर आहे.**

---

**५) प्रश्न:-** तळघर या सामासिक शब्दाचा विग्रह करा

१) तळात असलेले घर
२) तळाचे घर
३) तळयात असेलेले घर
४) घराचे तळ

**आक्षेप:-** पर्याय क्र. १ व ३ हे दोन्ही बरोबर आहे.

**स्पष्टीकरण:-** तळघर या सामासिक शब्दाचा अर्थ तळाचे घर असा होतो. **पर्याय क्र.२ हे उत्तर बरोबर आहे.**

---

**६) प्रश्न:-** दुचाकी वाहन चालविण्याचे शिकाउ लायसन्स असताना तुम्ही

१) फक्त दिवसा कमी रहदारीच्या रस्त्यावर वाहन चालवु शकता
२) मागे दुसरी व्यक्ती बसु शकत नाही.
३) पक्के लायसन्स धारक व्यक्ती मागे बसली असेल तरच चालवु शकते
४) यापैकी नाही.

**आक्षेप:-**उत्तरतालिकेतील दिलेला पर्याय चुकीचा असुन पर्याय क्र. २ हे बरोबर उत्तर आहे.

**स्पष्टीकरण:-** केंद्रीय मोटार वाहन कायदा मधील कलम ३(ब) प्रमाणे **पर्याय क्र (३) हे उत्तर बरोबर आहे.**

**खालील प्रश्नांचे उमेद्वारांनी घेतलेल्या आक्षेपांची दखल घेवुन प्रश्न व उत्तरांची खात्री करून प्रश्नांच्या उत्तरांमध्ये बदल करणेत आलेला आहे.**

- **प्रश्न:-** 

हे चिन्ह काय दर्शविते?

  १) ३.५ मी पेक्षा अधिक उंचीच्या वाहनाना प्रवेश

  २) ३.५ मी पेक्षा अधिक रुंदीच्या वाहनाना प्रवेश

  ३) ३.५ मी पर्यंत उंचीच्या वाहनाना प्रवेश

  ४) ३.५ मी पेक्षा कमी उंचीच्या वाहनाना प्रवेश

**आक्षेप:-** पर्याय क्र. ३ व ४ दोन्ही बरोबर आहेत.

**स्पष्टीकरण:-**पर्याय क्र. ३ उत्तर देण्यात आले होते. पण मोटार वाहन अधिनियम चे परिशिष्ट १ प्रमाणे दिलेल्या चिन्हानुसार **पर्याय क्र. ४ हे उत्तर बरोबर आहे.**

---

**प्रश्न :-** प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्राची विधी ग्राहयता

१) सहा महीने

२) एक वर्ष

३) दोन वर्ष

४) १ व ३ बरोबर

**आक्षेप:-** पर्याय क्रमांक २ हे उत्तर आहे.

**स्पष्टीकरण:-** या प्रश्नाचे उत्तर पर्याय १ देण्यात आलेला होता. केंद्रीय मोटार वाहन नियम कलम ११५ (७) प्रमाणे **पर्याय क्र. १ किंवा २ ही उत्तरे बरोबर आहेत.**

---

**प्रश्न :- पेपर सेट कोड A मधील प्रश्न क्र ८८ व ८९ मधील आकृतीमध्ये प्रिंट झाले नसल्याने तांत्रिक अडचणीमुळे ज्या उमेद्वारांनी सदर प्रश्नाचे उत्तर सोडवले आहे. त्या उमेद्वारांना पेपर सेट A प्रश्न क्र. ८८ व ८९ या प्रश्नांकरीता प्रत्येकी एक गुण देण्यात येणार आहेत.**

-----------------------------------------------------------------------

- **प्रश्न:-**जड वाहना करीता कमाल वेग मर्यादा

१) ताशी ७० किमी २) ताशी ६५ किमी

३) ताशी ५० किमी ४) यापैकी नाही.

**आक्षेप:-**पर्याय क्र. २ व ३ दोन्ही बरोबर आहेत.

**स्पष्टीकरण:-** जड वाहनांची कमाल मर्यादा ही मोटार वाहन अधिनियम प्रमाणे कलम ११२ प्रमाणे वेगवेगळया राज्यात वेगवेगळे वेगमर्यादा देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सदर प्रश्न ज्यांनी सोडविला आहे. त्यांना पुर्ण मार्क देण्यात येतील

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय सोलापूर ग्रामीण.**

**प्रति,**
**मा.संपादक**

**२/- सदरची बातमी आपले लोकप्रिय दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करणेस विनंती आहे.**